महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

==========================================================================

जा.क्र तंशिविकापु/विवि/थेट द्वितीय वर्ष प्रवेश/२०२०/ 4386

दिनांक :- 16 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था,

विषय :- थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था बदलाबाबत...

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम वर्षातून द्वितीय वर्षामध्ये संस्था बदलाबाबतचे कार्यालयीन आदेश या विभागीय कार्यालयाने निर्गमित केले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांची संस्था बदलाची माहिती या कार्यालयाने थेट द्वितीय वर्ष रिक्त जागा मंजूरी बाबतच्या पोर्टलवर अद्ययावत केलेली आहे व त्याप्रमाणे रिक्त जागांमध्ये बदल झालेला आहे.

ज्या संस्थांमध्ये विद्यार्थी संस्था बदल करुन या विभागीय कार्यालयाच्या आदेशानुसार संस्थाबदलाने प्रवेशित झाले आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर अद्ययावत झाल्याबाबत व त्याप्रमाणे रिक्त जागांच्या संख्येत बदल झाल्याबाबत खात्री करावी. तसेच त्याबाबत काही त्रुटी आढळल्यास या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

संस्थांनी त्यांच्या संस्थेतील संस्थाबदलाची रिक्त जागांची ऑनलाईन माहिती दिनांक १७/१२/२०२० रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत न चुकता सादर करावी.

16/12/2020
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे